VOL- IX ISSUE- X OCTOBER 2022 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.331 ISSN 2349-638x

# छत्रपती शिवाजी महाराज यांचे प्रशासन व व्यवस्थापन विषयक विचार

**प्रा.डॉ.भगवान सांगळे**
बाबूजी आव्हाड महाविद्यालय, पाथर्डी

**प्रस्तावना:**

मध्यकाळात साधारणत: सतराव्या शतकात देशात विविध राजे ,संस्थान अस्तित्वात होती. त्यामध्ये आदिलशाही या संस्थानामध्ये शहाजीराजे सरदार होते.त्यांना दोन मुले होती.शिवाजी महाराजांनी आपल्या कुशल नेतृत्व, कर्तबगार बाणा, धैर्य, चिकाटी आणि आपल्या सहकारी मावळ्यांना घेऊन स्वराजाची स्थापना केली. साधारणत: २० ते ३० वर्ष उत्तम राजकारभार केला.आपल्या सत्तेचा विस्तार केला. या शोध निबंधात छत्रपती शिवाजी महाराज यांचे व्यवस्थापन विषयक विचारांचा अभ्यास केला आहे.

छत्रपती शिवाजीराजे भोसले हे मराठा साम्राज्याचे संस्थापक होते. विजापूरच्या आदिलशाहीविरुद्ध आणि मोगल साम्राज्याविरुद्ध तसेच इंग्रज शक्तींशी संघर्ष करून रायगड ही राजधानी असलेले स्वतंत्र मराठा राज्य शिवाजी महाराजांनी उभे केले.इ.स.१६७४ मध्ये शिवरायांचा मराठा साम्राज्याचे 'छत्रपती' म्हणून राज्याभिषेक झाला.शिस्तबद्ध लष्कर व सुसंघटित प्रशासकीय यंत्रणेच्या बळावर छत्रपती शिवाजी महाराजांनी एक सामर्थ्यशाली आणि प्रागतिक राज्य उभे केले. प्रदेशातील भूभागाची इत्यंभूत माहिती, आश्चर्यजनक वेगवान हालचाली आणि गनिमी काव्याचे तंत्र यांच्या सहाय्याने त्यांनी आपल्या मावळ्याच्या सहाय्याने बलाढ्य अशा मुघल,औरंगजेब व आदिलशाही फौजांचा यशस्वीपणे सामना केला. किनारी आणि अंतर्गत प्रदेशातील किल्ल्यांची डागडुजी करण्यासोबतच त्यांनी अनेक किल्लेही उभारले. राज्यकारभारात तत्कालीन रूढ असलेल्या उर्दू व पारशी भाषेऐवजी मराठी आणि संस्कृत भाषेचा वापर करण्यास त्यांनी प्रोत्साहन दिले.भारतीय स्वराज्य स्थापनेसाठी अनेक नेत्यांनी शिवाजी महाराजांच्या पराक्रमी कथांचा वापर लोकांना एकत्रित आणण्यासाठी आणि त्यांचे मनोबल वाढवण्यासाठी करून घेतला. महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय इतिहासामध्ये शिवाजी महाराजांचा नेतृत्वाचा तसेच प्रशासकीय कार्याचा मोठा प्रभाव आहे. शिवाजी महाराज मराठी लोकांच्या अस्मितेचा एक अविभाज्य भाग आहेत. शिवाजी महाराजांना व्यवहारिक शिक्षणामध्ये अधिक रस आहे हे ओळखून राजमाता जिजाईने व्यावहारिक शिक्षण दिले.तसेच आपल्या राज्याचा कारभार कसा चालवावा या संदर्भात मार्गदर्शन केले.

**प्रशासन अर्थ :**

"प्रशासन म्हणजे व्यक्तींना कौशल्याने, पद्धतशीरपणे, तर्कसुसंगत पद्धतीने हाताळणे होय."[१]

**प्रशासनाच्या व्याख्या :**

**१.जेम्स लुंडी यांच्या शब्दात,** "एखादे विशिष्ट उद्दीष्ट साध्य करण्यासाठी इतरांच्या प्रयत्नाचे नियोजन,समन्वय व नियंत्रण करून त्यांना कार्यप्रवृत्त करणे म्हणजे प्रशासन होय".[२]

**२.जॉर्ज टेरी यांच्यामते,**"व्यवस्थापकाला योजना तयार करणे ,संघटना निर्माण करणे,कर्मचा-यांना प्रोत्साहित करणे आणि त्यांच्या हालचालीवर नियंत्रण ठेवणे ही कार्य करावी लागतात .त्यालाच व्यवस्थापन असे म्हणतात."[३]

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१. शिवाजी महाराजांचा इतिहास अभ्यासणे.
२. प्रशासनाचा अर्थ समजून घेणे.
३. शिवाजी महाराजांचे प्रशासनिक विचार अभ्यासणे.
४.शिवाजी महाराजांचे व्यवस्थापन विषयक विचार अभ्यासणे.

**संशोधन पद्धती:**

हा संशोधन लेख पूर्ण करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करण्यात आलेला आहे.ज्यामध्ये विविध

संदर्भग्रंथ, पुस्तके, मासिके, साप्ताहिके, वर्तमान पत्रातील लेख इत्यादी तसेच इंटरनेट वरील माहितीचा आधार घेतला आहे.

**शिवाजी महाराज यांचे प्रशासनिक विचार:**

शिवाजी महाराजांचे प्रशासन विषयक विचार कार्याचे अवलोकन केल्यास त्यांच्या कार्याचे तीन भाग पाडावे लागतील.

**१. इ.स.१६३६ ते १६४७ हा कालखंड:**

या कालखंडात आदिलशहाने शहाजीला कर्नाटकाकडे पाठवल्यावर त्याच्या पुण्याच्या जाहागिरीची व्यवस्था पाहण्यासाठी म्हणून शहाजी ने दादोजी ची नियुक्ती केली.त्याचबरोबर जिजाबाई आणि शिवाजी यांची ही त्यांच्यावर जबाबदारी सोपविली.इ.स. १६३० मध्ये झालेल्या दुष्काळामुळे हा भाग होरपळून निघाला होता. उद्ध्वस्त झालेल्या या प्रांतातील वस्ती वाढविण्यासाठी शिवाजीने अहोरात्र मेहनत घेतली. शेती व इतर व्यवसायांना प्रोत्साहन देऊन तो प्रदेश भरभराटीला आणला.त्या भागातील मारामारीचे लोटालुटीचे प्रकार शिवाजीने थांबवले. त्यामुळे प्रशासनाची धडे शिवाजीला येथे गिरवता आले.

**२.इ.स.१६४७ ते १६७४ हा कालखंड:**

इ.स. १६४७ मध्ये दादोजी कोंडदेवाचा मृत्यू झाला आणि आपल्या जहागिरीच्या प्रशासनाची जबाबदारी शिवाजी महाराजांनी उचलली, अर्थात या कालखंडात जिजाबाईचे त्यांना मार्गदर्शन मिळत असे. पण तरीही ह्या कालखंडात आता शिवाजी महाराज स्वतः निर्णय घेऊ लागले. एकेक अनुभव येत गेली, तसतशी त्यांची प्रशासकीय दृष्टीही विकसित होत गेली.सुरुवातीच्या काळातील घडलेल्या एकाच उदाहरणावरून आपल्याला शिवाजी प्रशासनाची चुणूक दिसून येते. त्यांच्या खेडेबारे तप मध्ये रांजे गाव येत होते या गावाचा पाटील बाबाजी भिकाजी गुजर होता त्याच्याविरुद्ध तक्रार त्याच परगण्यातील देशमुख, देशपांडे यांनी केली त्यासंबंधी शिवाजी महाराजांनी चौकशी केली असता, असे दिसून आले की बावाजी भिकाजी गुजर ने गुन्हा केलेला आहे. म्हणून शिवाजी महाराजांनी त्याची पाटीलकी रद्द केली, त्याला दंड ठोठावला या घटनेची बातमी सर्वत्र पसरली म्हणून पुरंदर किल्ल्यावर काम करीत असलेल्या त्याचा नातलग सोनजी बाबाजी गुजर आपल्या अपंग झालेल्या भावाचा सांभाळ करण्यासाठी त्याला आपल्याकडे सोपवावे अशी विनंती केली.शिवाजी महाराजांनी ती मान्य केली. एवढेच नव्हे तर त्याच्या खर्चासाठी दोनशे रुपये होन दिले.

**३.इ.स १६७४ ते १६८० हा कालखंड:**

इ.स.१६७४ मध्ये शिवराज्याभिषेक झाल्यानंतर शिवाजी महाराजाचे सार्वभौम राज्य अस्तित्वात आले.त्यावेळेपर्यंत शिवाजी महाराजाच्या प्रशासन तसेच राज्यव्यवस्थेत निश्चित असा आकार आला होता.शहाजीने कर्नाटकातून कारभारासाठी सहा विश्वासू सरदारांना पाठविले होते.राज्याभिषेकापर्यंत ही संख्या सात झाली.शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाल्यावर ती संख्या आठ होऊन शिवाजीचे अष्टप्रधान मंडळ तयार झाले.शिवाजी महाराजाने आधीच्या सात मंत्र्यांमध्ये पंडितराव एक भर घातली होती.प्रसिद्ध इतिहासकार शेजवलकर यांच्या मते शुक्रनीति सारानुसार हे मंत्रिमंडळ तयार केले होते.शिवाजीने या राज्याची स्थापना केलेली असल्यामुळे छत्रपती हे त्यांच्या राज्याचे मुख्य अंग होते.[४]

**शिवाजी महाराजांचे व्यवस्थापन विषयक विचार:**

शिवाजी महाराज यांचे व्यवस्थापन विषयक विचार पुढील प्रमाणे

**१.अर्थव्यवस्थापन :** कुठल्याही व्यवसायासाठी आर्थिक भांडवल अतिशय आवश्यक असते.शिवाजी महाराजांनी त्यांच्या काळात उत्तम आर्थिक व्यवस्थापन करत मोठमोठ्या मोहीम यशस्वी केल्या.त्यांच्या कुठल्याही मोहिमेसाठी ते कमी खर्चात व्यवस्थापन करू शकतील अशीच माणसे बरोबर घ्यायचे.त्यांचे गुप्तहेर खाते खूप चांगले होते.ही गुप्तहेर मंडळी मोहीम आखण्याच्या आधी सगळ्या परिस्थितीचा आढावा घेऊन स्पॉट एनालीसीस करून सगळी माहिती महाराजांपर्यंत पोहोचवत असत.

**२.पायाभूत सुविधा उभारणे :** कुठलाही उधोग उभा करताना मुलभूत सुविधा असणे अत्यंत आवश्यक असते.महाराजांनी त्याकाळी सुध्दा पायाभूत सुविधा उभारण्याला खूप महत्व दिले.त्याकाळी वीज नव्हती तरीही हवेचा,अग्नीचा,धुराचा योग्य उपयोग करून अनेक पायाभूत सुविधा उभारल्या. शेती निर्माण करून गरजू लोकांना ती जमीन कसायला दिली.

**३.कामासाठी कुशल कार्यबल तयार करणे:** चागले काम करणारे आणि कामासाठी कायम उत्सुक असणारे

कर्मचारी तयार करणे हे कुठल्याही टीम लीडरसाठी एक कसब असते.त्याला स्वत:च्या कामातून सहकार्यांसाठी आदर्श घालून द्यावा लागतो.शिवाजी महाराजांनी त्यांच्या मावळ्यांमध्ये स्वराज्य स्थापनेची तीव्र इच्छा निर्माण केली.त्यांच्या मनात मातृभूमीविषयी आदर आणि प्रेम जागृत केले.

**४.सतत नव्या गोष्टी शिकण्याची तयारी:** कुठल्याही माणसाला जर प्रगती करायची असेल तर त्याने सतत जगाबरोबर चालणे आवश्यक असते.त्यामुळे सतत नवे काहीतरी शिकण्याची इच्छा असणे आणि त्यासाठी प्रयत्न करणे ह्यामुळे माणूस प्रगतीच्या दिशेने पाउल टाकतो.शिवाजी महाराज सुध्दा सतत नव्या युद्धनीती बद्दल जाणून घेत असत आणि त्या अमलात आणण्याचा प्रयत्न करत असत.ते वेळोवेळी विविध प्रकारच्या शस्त्रांबद्दल जाणून घेत असत आणि त्यांच्या सैनिकांकडे चांगली व योग्य शस्त्रे असावीत ह्यावर त्यांचा कटाक्ष होता.

**५.दुरदृष्टी** :जवळजवळ संपूर्ण भारत मुघल आणि इतर मुस्लीम राज्यकर्त्यांच्या तावडीत सापडलेला असताना शिवाजी महाराजांनी भविष्याचा विचार करून स्वराज्याचे स्वप्न बघितले आणि अखंड कष्ट करून ते स्वप्न पूर्ण केले.स्वतंत्र भारताचे स्वप्न बघून ते स्वप्न त्यांनी सर्वसामान्य जनतेच्या मनात देखील रुजवले.[५]

**सारांश :**

शिवाजी महाराजांनी स्वराज स्थापन करण्याचा निर्णय घेतला होता. स्वराज म्हणजे स्वत:चे राज्य होय.व्यवसाय म्हटले कि,व्यवस्थापन आलेच. व्यवसायच काय तर वैयक्तिक आयुष्यात सुध्दा व्यवस्थापन चांगले नसेल तर माणूस प्रगती करू शकत नाही.छत्रपती शिवाजी महाराज एक शासक नव्हते तर ते उत्तम व्यवस्थापक देखील होते.त्यांचे व्यवस्थापन कौशल्य अदितीय होते.त्यांना प्रचंड दूरदृष्टी होती.त्या काळात त्यांनी दूरदृष्टीने भविष्याचा विचार करून विविध योजना आखल्या.त्यांच्या उत्तम व्यवस्थापन कौशल्याचा वापर करून त्यांनी यश देखील प्राप्त केले. आपल्या स्वराज्यातील मुलुख विकसित झाला की स्वराज्याच्या महसुलात वाढ होणार आहे.हे सूत्र त्यांना महित्ती होते म्हणून ते योग्य ठिकाणी आर्थिक गुंतवणूक करत असत.

शिवाजी महाराजांनी वेळोवेळी विविध तज्ञांशी चर्चा करून त्यांच्या मोहिमांची आखणी करत असत आणि स्वराज्य अधिकाधिक सुसज्ज कसे होईल ह्यासाठी प्रयत्न करीत असत.त्यांची दूरदृष्टी,कौशल्य परकीय शक्तींना धोपवण्याची क्षमता, लोककल्याणकारी धोरणे, मुत्सद्देगिरी, शौर्य ह्या सर्व गोष्टीतून आपल्याला भरपूर शिकायला मिळते.यामुळे शिवाजी महाराज हे एक कुशल व्यवस्थापक होते, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

**संदर्भग्रंथ :**

१.प्रा.डॉ.एस.आर.मेढे,प्रा.डॉ.एस.एन.गवळी,प्रा.डॉ.जी.आर .डुंब्रे,प्रा.डॉ.जे.एस.देशमुख- व्यवसाय व्यस्थापन (२०१४), सक्सेस पब्लिकेशन पुणे, पृ.क्र. २.

२.प्रा.डॉ.पंतोजी शेळके व प्रा.डॉ.अजिनाथ डोके- व्यवसाय व्यस्थापन (२०१४),डायमंड पब्लिकेशन पुणे.,पृ.क्र. २.

३.प्रा.डॉ.प्रभाकर देशमुख आणि प्रा.डॉ.रवींद्र देशमुख- व्यवसाय व्यस्थापन (२०१४), पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिकेशन नागपूर, पृ.क्र.४९.

४.प्रा.डॉ.विभा आठल्ये,मराठ्यांचा इतिहास-(२०००), अंशुल पब्लिकेशन नागपुर,पृ.क्र. २२१ व २२२.

५. https://www.inmarathi.com